<u>नियमित दिवाणी दावा क्र.२१/२०१०</u>
<u>प्रतिवादीतर्फे सा.क्र.१</u>
<u>निशाणी क्र.११८ वर पुढे सुरु...</u>

शपथेवर पुढे सुरु –

<u>प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. एस. टी. इंगळे यांच्यामार्फत पुढील सरतपासः–</u>

४. नि.क्र.११८ वर माझे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले असून त्यातील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर असल्यामुळे मी त्यावर माझी सही केलेली आहे. माझ्या वडीलांनी दि.३०.०९.१९९२ रोजीच्या खरेदीखताने रमाकांत शालीग्राम पल्हाडे यांच्या सोबत शिट क्र.५, प्लॉट क्र.८६० मधील १०.७२ चौ.मी. ही जागा खरेदी केली होती. आता मला सदरचे खरेदीखत दाखविण्यात आले, त्यातील मजकूर मी वाचलेला असून तो खरा व बरोबर आहे, त्यावर पान क्र.१ वर माझ्या वडीलांची सही दिसून येते तसेच पान क्र.५ वर लिहून देणार रमाकांत पल्हाडे यांची सही तसेच साक्षीदार म्हणून प्रल्हाद जानकीराम डोंगरे व महादेव भाऊराव सरप यांची सही आहे. सदर मुळ खरेदीखतास **नि.क्र.१२३** देण्यात येत आहे.

५. आता मला सन २००९–२०१० या वर्षाची ग्रामपंचायत वाडेगाव यांनी पारीत केलेली पावती क्र.६ दाखविण्यात आली. सदरची पावती ही माझ्या वडीलांनी खरेदी केलेल्या दुकान जागेची कर पावती आहे. तसेच आता मला सदर खरेदीखतानुसार माझ्या वडीलांच्या नावाची झालेल्या नोंदीचा नमुना ८ पत्रक दाखविण्यात आले. सदरचे पत्रक हे सन २००९–२०१० चे असून ते माझ्या वडीलांच्या नावे ग्रामविकास अधिकारी यांनी पारीत केले आहे. सदर दस्तास निशाणी देण्याची विनंती प्रतिवादीच्या वकीलांकडून करण्यात आली. <u>त्यास वादीच्या वकीलांकडून हरकत उपस्थित करण्यात आली की,</u> सदरचे दस्त हे सार्वजनिक दस्त नसून सदर साक्षीदार हा सदर दोन्ही दस्ताचा लेखक नाही. (प्रतिवादीच्या वकीलांकडून सदर दोन्ही दस्त हे दि.३०.०९.१९९२ च्या खरेदीखतान्वये नोंद होऊन पारीत करण्यात आलेले आहे तसेच सदरचे दस्त हे सार्वजनिक दस्त व मुळ असल्याने तसेच खरेदीखत करुन घेणार हे त्याचे वडील असून ते सद्या हयात नसलयाने सदर कागदपत्रांस निशाणी देण्याची विनंती करण्यात आली.) **आदेशः** प्रस्तुत कर

पावती व नमुना ८ हे ग्रामपंचायत वाडेगाव येथील ग्रामविकास अधिकारी यांच्या सही व शिक्काने पारीत झालेले असून त्याची मुळ प्रत दाखल केलेली आहे. भा.पु.का. कलम ६२ नुसार सदरचे दस्त हे मुळ असल्याकारणाने ते प्राथमिक पुरावा आहेत तसेच ते ग्रामपंचायत येथून संबंधित अधिकाऱ्याकडून पारीत केलेले असल्यामुळे त्यास निशाणी देण्यास हरकत नाही. सदर कर पावतीस **नि.क्र.१२४** आणि नमुना ८ ला **नि.क्र.१२५** देण्यात येत आहे.

सरतपास पुर्ण.

वादी यांचे विधीज्ञ श्री. पी. बी. रेडे यांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात येत आहे.

**दिनांकः– २४.०७.२०२५**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE
Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2025.07.24 17:44:45 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**बाळापूर**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | २४/०७/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | २४/०७/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | २४/०७/२०२५ |